वर्ष- ११ | अंक- १५ | मुंबई, मंगळवार,२५ फेब्रुवारी ते ३ मार्च २०२५ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र

# POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 नैसर्गिक लुकसाठी लिपस्टिक ऐवजी या गोष्टी वापरुन पहा

3 → परीक्षांची पर्वा

रणवीर अलाहबादीयाची केस लढवणारे अभिनव चंद्रचूड कोण आहेत? ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## लाचेप्रकरणी पीएसआय ताब्यात, आरोपी करु नये यासाठी मागितली इतकी लाच



**ठाणे :** भिवंडी येथील कोनगाव पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) राजेश डोंगरे (३४) याला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने (एसीबी) १० हजार रुपयांची लाच घेताना ताब्यात घेतले आहे. हत्येच्या प्रयत्न प्रकरणी दाखल गुन्ह्यात आरोपी करू नये यासाठी त्याने तक्रारदाराकडून लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले आहे. राजेश डोंगरे विरोधात कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोनगाव पोलीस ठाण्यात राजेश डोंगरे हे पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत आहेत. कोनगाव पोलीस ठाण्यात हत्येच्या प्रयत्न प्रकरणात एक गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणातील एकाला आरोपी करु नये यासाठी डोंगरे याने त्यांच्याकडून ८० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तडजोडीअंती २५ हजार रुपये देण्याचे ठरले होते. अखेर त्यांनी याप्रकरणी तक्रार देण्यासाठी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. त्यांनी राजेश डोंगरे याच्याविरोधात तक्रार दाखल केली.

दरम्यान, शनिवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता, डोंगरे याने १० हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानंतर तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून राजेश डोंगरे याला १० हजार रुपये घेताना ताब्यात घेतले. याप्रकरणाची नोंद कोनगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ठाणे, कोकण पट्ट्यात मागील वर्षभरात लाचखोरीमध्ये सर्वाधिक कारवाई पोलिसांवर झाली आहे. ठाणे लाचलुपत प्रतिबंधक विभागाने १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत रचलेल्या सापळ्यांमध्ये ठाण्यासह कोकण क्षेत्रातील २१ पोलीस अधिकारी आणि कर्मचारी सापळ्यात अडकले होते. त्यापाठोपाठ महसूल, पालिकेतील कर्मचाऱ्यांचेही लाच घेण्याचे प्रमाण अधिक असल्याचे कारवाईतून स्पष्ट झाले आहे. लाच घेणे आणि देणे दोन्ही गुन्हे असतानाही ठाणे, पालघर आणि तळ कोकणामध्ये लाचेचा विळखा शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये घट्ट पकडला आहे. त्यातही लाच घेण्यामध्ये पोलीस अव्वल ठरल्याचे कारवाईतून आढळून आले आहे.

कारवाई टाळण्यासाठी, जामीन मिळवून देणे, अटक करु नये अशा विविध कारणांसाठी पोलिसांनी लाच मागितल्याचे समोर आले आहे. २०२४ मध्ये ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एकूण ६६ सापळे रचले होते. त्यामध्ये ९८ जणांविरोधात गुन्हे दाखल झाले. या सापळ्यांमध्ये सर्वाधिक कारवाया पोलिसांविरोधात झाल्या आहेत. ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या परिक्षेत्रात ठाणे, नवी मुंबई, पालघर, रायगड-अलिबाग, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हा भाग येतो. या क्षेत्रांत ग्रामीण आणि शहरी पोलीस असा दोन्ही भाग येतो. विभागाच्या कारवाईत एकूण २१ पोलिसांवर लाचखोरीचे गुन्हे दाखल झाले.

## पहिल्या मजल्यावरील झोपडवासीयांना मोफत घर, आता सर्वोच्च न्यायालयात आव्हान

**मुंबई :** पहिल्या मजल्यावरील सर्वच झोपडीवासीयांना सरसकट वा सशुल्क मोफत घराचा लाभ देण्यास उच्च न्यायालयाने नकार दिल्यानंतर भारतीय जनता पक्षाचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचे ठरविले आहे. पहिल्या मजल्यावरील झोपडीधारकांना मोफत वा शक्य नसेल तर सशुल्क किंवा पंतप्रधान आवास योजनेत घरे उपलब्ध व्हावीत याबाबत शेट्टी आग्रही आहेत. जुन्या चाळींचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेनुसार पुनर्विकास करताना पहिल्या वा त्यावरील मजल्यावर राहणाऱ्या रहिवाशाला मोफत घराचा लाभ देता येत नव्हता. त्यामुळे जुन्या चाळींचा झोपु योजनेनुसार पुनर्विकास करण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. पहिल्या मजल्यावरील सर्वच झोपडीवासीयांचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा, अशी मागणी करणारी अनेक पत्रे शेट्टी यांनी राज्य शासन तसेच प्राधिकरणाला पाठविली होती. मात्र यापैकी, १ जानेवारी १९७६ पर्यंतच्या चाळी वा झोपडपट्टीला हा लाभ देता येईल, याकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने लक्ष वेधले होते. या शिवाय चाळीतील पहिल्या मजल्यावरील भाडेकरूंना पंतप्रधान आवास योजनेच्या निकषानुसार घर देता येईल का याची चाचपणी करण्याचेही सुचविण्यात आले. या रहिवाशांना झोपु योजनेत उपलब्ध होणाऱ्या प्रकल्पबाधितांसाठी असलेल्या सदनिका देण्याची



सूचना करण्यात आली होती. या सदनिका उपलब्ध नसल्यास अन्य योजनांमधील सदनिकांचा विचार करता येईल, असे प्राधिकरणाने म्हटले होते. तसा प्रस्ताव गृहनिर्माण विभागाकडे प्रलंबित होता. याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. मात्र ती फेटाळण्यात आल्यामुळे शेट्टी यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचे ठरविले आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पात बहुमजली झोपड्यांना सशुल्क वा भाड्याची घरे दिली जाणार आहेत. मात्र मूळ झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत तो लाभ देण्याची शासनाची तयारी नाही. एकाच शहरात दोन वेगळे कायदे कसे लागू होऊ शकतात, असा सवाल शेट्टी यांनी केला. बहुमजली झोपड्यांना घरांचा लाभ न देण्याचा निर्णय धोरणात्मक असून तो घटनाबाह्य असल्याचे सिद्ध होत नाही तोपर्यंत न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही, असे उच्च न्यायालयाने नमूद केल्याकडे शेट्टी यांनी लक्ष वेधले. आपण त्याच मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहोत, असे त्यांनी सांगितले.

## 'पवित्र' संकेतस्थळाकडून १०९९ शिक्षक उपलब्ध

**मुंबई :** महापालिकेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यासाठी राज्य सरकारच्या पवित्र संकेतस्थळाद्वारे मुंबई महापालिकेला तब्बल १०९९ शिक्षक उपलब्ध झाले आहेत. मुंबई महापालिकेने शिक्षकांच्या १३४२ जागा भरण्यासाठी जाहिरात दिली होती. त्यापैकी बहुतांशी शिक्षक मिळाले असून त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. मुंबई महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढली, तरी गेल्या काही वर्षात शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त झाली होती. मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, तमिळ, तेलुगू, कन्नड, गुजराती अशा आठ भाषिक माध्यमांच्या शाळा चालवल्या जातात. बालवाडी ते दहावीपर्यंतच्या सुमारे १,१२९ शाळांमध्ये मिळून सध्या ३ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कोविड काळानंतर पालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढू लागली. तसेच, सीबीएसईच्या शाळा, अन्य बोर्डांच्या शाळा, शैक्षणिक वस्तू यामुळे विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे शिक्षण विभागाचे कौतुक होत असले, तरी पालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होत असल्याची गेल्या काही वर्षांपासूनची तक्रार होती. मात्र, गेल्या वर्षी मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी माध्यमांसाठी १३४२ पदे भरण्यासाठी जाहिरात दिली होती. उपलब्ध झालेल्या अनेक शिक्षक उमेदवारांपैकी अनेक उमेदवारांनी पालिकेच्या पत्राला प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे सध्या तरी केवळ १०९९ शिक्षक उपलब्ध झाले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, प्रत्यक्षात १३४२ जागांसाठी जाहिरात दिलेली असून, शिक्षक केवळ १०९९ मिळाले आहेत.

## तब्बल वीस वर्षानंतर फरार आरोपीला उत्तर प्रदेशातून अटक

**मुंबई :** घरफोडीच्या गुन्ह्यांत सहभागी आरोपीला २० वषार्नंतर पुन्हा उत्तर प्रदेशातून अटक करण्यात रफी अहमद किडवाई (आरएके) मार्ग पोलिसांनी यश आले आहे. आरोपी २००५ पासून न्यायालयापुढे हजर होत नसल्यामुळे त्याच्याविरोधात अजामिनपात्र वॉरंट काढण्यात आले होते. अखेर पोलीस पथकाने उत्तर प्रदेशात जाऊन मोठ्या शिताफीने त्याला अटक केली

हबीबुल भोलु इमाम बक्श शेख उर्फ भुल्लू असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो २००३ मध्ये शिवडी परिसरात राहत होता. त्यावेळी आरएके मार्ग पोलिसांनी त्याला घरफोडीच्या गुन्ह्यांत २००३ मध्ये अटक केली होती. त्याच्याविरोधात भारतीय दंड विधान कलम ४५७, ३८०, ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी जामीन मिळाल्यानंतर २००५ पासून तो शिवडी न्यायालयात सुनावणीसाठी अनुपस्थित राहू लागला. अखेर न्यायालयाने याची गंभीर दखल घेत आरोपीविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले व त्याला फरार घोषित करण्यात आले. तेव्हापासून आरोपी पोलिसांचा




समेमिरा चुकवत होता.

मुंबईतून फरार आरोपींना अटक करण्याबाबत मुंबई पोलिसांकडून नुकतीच विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. त्यात पोलीस ठाण्यातील जुन्या गुन्ह्यांतील फरात आरोपींना अटक करण्याला प्राधान्य देण्याच्या सूचना वरिष्ठांकडून देण्यात आल्या आहेत. त्यानुसार उपायुक्त रागसुधा आर. यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव व इतर पोलिसांचे पथक स्थापन करण्यात आले. आरएके मार्ग पोलीस ठाण्यातील या पोलीस पथकाने आरोपीचा शोध घेण्यास सुरूवात केली. त्यावेळी आरोपीबाबत कोणतीही ठोस माहिती मिळत नव्हती. तसेच तो मुंबईतही सध्या वास्तव्याला नसल्याचे समजले. अखेर पोलिसांनी खबऱ्यांमार्फत माहिती मिळवली असता. आरोपी उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यातील बबेरू तालुक्यात वास्तव्याला असल्याचे समजले. त्यानुसार उत्तर प्रदेशात एक पोलीस पथक रवाना करण्यात आले. त्यांनी तेथे जाऊन माहिती घेतली असता आरोपी हरदोली परिसरात असल्याचे त्यांना समजले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने हरदोली येथे जाऊन आरएके मार्ग पोलिसंच्या पथकाने भुल्लूला अटक केली. त्यानंतर त्याला मुंबई आणण्यात आले व न्यायालयापुढे हजर करण्यात आले.

याप्रकरणी न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पोलीस पथकाने तीन दिवस उत्तर प्रदेशात आरोपीची माहिती घेऊन मोठ्या शिताफीने त्याला अटक केली. आरोपीने १५ वर्षांपासून उत्तर प्रदेशात राहत होता. तो तेथे छोटी-मोठी कामे करत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## महालक्ष्मीच्या धोबीघाटावर पालिकेच्या खर्चाने पीएनजी, प्रदूषण रोखण्यासाठी निर्णय

**मुंबई :** लाकडावरील भट्ट्या स्वच्छइंधनावर रुपांतरित करण्यासाठी बेकरी उद्योगाला पालिका प्रशसानाने नोटीसा धाडल्या आहेत व कारवाईचा इशारा दिला आहे. मात्र महालक्ष्मी येथील सुप्रसिद्ध धोबीघाटाला पालिकेच्या खचार्ने पीएनजी (पाईप नॅचरल गॅस)ची जोडणी देण्यात येणार आहे. धोबीघाटात पाणी गरम गरम करण्यासाठी लाकूड जाळून जाळ केला जातो त्यामुळे होणारे प्रदूषण थांबवण्यासाठी पालिकेने हा निर्णय घेतला आहे. पालिका या कामासाठी २४ कोटी रुपये खर्च करणार आहे.

महालक्ष्मी स्थानकाजवळील धोबीघाटावर गेल्या अनेक वर्षांपासून धोबी समाज आपला उदरनिर्वाह करतात. अनेक वर्षांपासून या ठिकाणी कपडे धुणे, कपड्यांना रंग चढवणे, कपडे वाळवणे, ईस्त्री करणे अशा अनेक प्रक्रिया करत असतात. यामध्ये अनेकदा



मोठ्या प्रमाणावर पाणी गरम करण्यासाठी लाकूड जाळून जाळ तयार केला जातो. कधी चिंध्या, टाकाऊ कापड, टाकाऊ प्लास्टिक याचा वापर करून जाळ तेवत ठेवलेला असतो. त्यामुळे वातावरणात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. धोबीघाटात काम करणाऱ्या अनेकांना दमा, क्षयरोग असे आजार जडतात. तर काही धोबी हे एलपीजी सिलिंडरचा वापर करतात. मोठ्या प्रमाणावर सिलिंडर असल्यामुळे या परिसराला आग लागण्याचा धोकाही मोठा आहे. तसेच जागेच्या मयार्देमुळे अनेकदा सिलिंडरचा साठा करण्यावरही मयार्दा येतात. त्यामुळे धोबीघाटाला पीएनजीची यंत्रणा बसवण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे.

धोबी कल्याण आणि औद्योगिक विकास सहकारी संस्था मर्यादित ही संस्था धोबीघाटातील कामगारांना दैनंदिन कामादरम्यान उदभवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याचे काम करते. या संस्थेने धोबीघाटात पीएनजी गॅस जोडणीची मागणी केली आहे. पीएनजी पर्यावरणपूरक असल्यामुळे एलपीजीपेक्षा सुरक्षित व स्वस्त आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पालिकेने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे धोबीघाटावर पीएनजी वितरण व जोडणी तसेच उपकरणे यांचा पुरवठा करण्यासाठी पालिकेच्या यांत्रिकी व विद्युत विभागाने निविदा मागवून कंत्राटदार निश्चित केला आहे. या कामासाठी २० कोटी ९८ लाखांचे कंत्राट देण्यात आले आहे. सर्व करांसह हा खर्च २४ कोटींवर गेला आहे.

दरम्यान, समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी याबाबत म्हटले आहे की धोबीघाटाप्रमाणेच बेकरी उद्योगालाही पालिकेने आर्थिक सहाय्य केले पाहिजे. मुंबईत दोन हजार पेक्षा अधिक बेकरी असून त्यावर सुमारे दोन लाख लोकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार आहे. बेकरी उद्योगाला पालिकेने जळाऊ लाकूड वापरून भट्टी वापरण्यास बंदी केली आहे. पण त्यांच्या समस्या ऐकण्यास पालिकेने सुनावणी तरी घ्यावी अशी आमची मागणी आहे.

महालक्ष्मी स्थानकाच्या जवळच असलेल्या महालक्ष्मी धोबीघाटाची आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख आहे. या धोबीघाटाचा विस्तार सुमारे ८१.४० चौरस मीटर असून २०११ मध्ये गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात मोठा धोबीघाट म्हणून नोंदही झालेली आहे.



# नैसर्गिक लुकसाठी लिपस्टिकऐवजी या गोष्टी वापरून पहा

सुंदर दिसण्यासाठी, लोक अनेक प्रकारच्या मेकअप टिप्स वापरतात आणि एक अतिशय खास मेकअप उत्पादने म्हणजे लिपस्टिक. जरी तुम्हाला मेकअप घातला पाहिजे असे वाटत नसले तरीही तुम्ही फक्त लिपस्टिक लावून सुंदर दिसू शकता. पण जर तुम्हाला तुमच्या ओठांवर पूर्णपणे नैसर्गिक लूक हवा असेल तर तुम्ही लिपस्टिकऐवजी काही इतर लिप उत्पादने वापरून पाहू शकता. ओठांना नॅचरल लुक दिल्याने ओठ आणि चेहरा या दोन्हींचे आकर्षण आणि सौंदर्य वाढते. आज आम्ही तुम्हाला नॅचरल लूकसाठी कोणत्या गोष्टी वापरायला हव्यात ते सांगत आहोत.






## लिप क्रेयॉन

जर तुम्हाला तुमचे ओठ गुळगुळीत करायचे असतील तर लिपस्टिकऐवजी लिप क्रेयॉनचा वापर करा. लिप क्रेयॉन लावण्याची फॅशन झपाट्याने वाढत आहे. या काजळ्या पेन्सिलसारख्या असतात, त्यांना धारदार करत राहा आणि लावत राहा. मॅट आणि ग्लॉस लिप क्रेयॉन्सच्या सहाय्याने तुम्ही तुमचे ओठ नैसर्गिक बनवू शकता. हे ओठांना मॉइश्चरायझ करतात.




## लिप लाइनर

लिपस्टिक लावण्यापूर्वी लिप लायनर वापरण्याची खात्री करा, त्याचा रंग तुमच्या लिपस्टिकच्या रंगासारखा असावा. जर तो अचूक जुळणारा रंग नसेल, तर तो असा असावा की तो त्याच्यापेक्षा वेगळा दिसत नाही. ओठांच्या आऊटलाइनवर लिप पेन्सिल लावा, लिप पेन्सिलने लिपस्टिक भरा, यामुळे लिपस्टिक जास्त काळ टिकून राहते. यानंतर ब्रशने ओठांवर लिपस्टिक नीट पसरवा.

## लिप ग्लॉस

ओठ चमकदार आणि रंगीबेरंगी किंवा नैसर्गिक दिसण्यासाठी लिप ग्लॉस हा एक चांगला पर्याय आहे. लिप ग्लॉस तुमच्या ओठांना मऊ आणि लवचिक तर ठेवतेच शिवाय एक सुंदर लुकही देते. लिपस्टिकप्रमाणे ते मेण, तेल आणि रंगद्रव्याच्या मिश्रणाने बनलेले असतात. पातळ ओठांसाठी लिपग्लॉस खूप चांगले आहे. हे ओठांवर एक चमकदार थर तयार करते, ज्यामुळे ओठ अधिक मोकळे आणि भरलेले दिसतात.




## लीप बाम

लिप बाम ओठांच्या पृष्ठभागावर एक थर तयार करतो, ज्यामुळे ओलावा बंद होतो आणि ओठ मऊ राहतात. लिप बाममध्ये असलेले मेण, पॅराफिन, लॅनोलिन इत्यादी ओठांना कोरडे ठेवतात आणि ते क्रस्ट होत नाहीत. तसेच चेहरा फ्रेश दिसतो. तुमच्या आवडीनुसार तुम्हाला शोभेल अशा शेडचे लिप बाम तुम्ही निवडू शकता.




# साबुदाण्याच्या फेसपॅकचे फायदे

साबुदाणा जेवढे पोटासाठी फायदेशीर आहे तेवढेच सौंदर्याच्या दृष्टीने देखील फायदेशीर आहे. साबुदाण्याची पेस्ट बनवून आपण चेहऱ्यावर लावल्याने चेहऱ्यावर चकाकी येते. हे पॅक बनवायला देखील सोपे आहे. चला जाणून घेऊ या बनवायची कृती आणि फायदे.



साबुदाण्यात व्हिटॅमिन बी ६ स्टार्च, आयरन, केल्शियम, कॉपर, सेलेनियम, सोडियम तत्व आढळतात याची पेस्ट बनवून लावल्याने चेहऱ्यावरील डाग नाहीसे होतात. हे फेस पॅक चेहऱ्यावर लावून १५ मिनिट ठेवा नंतर पाण्याने धुवून घ्या. त्वचेची चमक पुन्हा मिळेल.

साबुदाण्याचे फेसपॅक बनविण्यासाठी एका भांड्यात साबुदाणा घ्या त्यात लिंबाचा रस मिसळा. गॅसवर गरम करण्यासाठी ठेवा. मिश्रण शिजल्यावर गॅस बंद करून द्या. थंड झाल्यावर मिक्सरमध्ये वाटून घ्या. त्यात ब्राऊन शुगर आणि लिंबू, मुल्तानी माती मिसळा. फेसपॅक तयार आहे.



फायदे-

* हे फेसपॅक लावल्याने त्वचा मऊ आणि कोवळी होते.
* कोरडी त्वचेसाठी साबुदाण्याचे फेसपॅक फायदेशीर आहे.
* मुरुमांच्या समस्येपासून आराम मिळतो.
* त्वचा एक्सफॉलिएट करतो.

# सुंदर त्वचेसाठी साजूक तुपाचे घरगुती उपाय



तुपाचा वापर केवळ जेवणातच नाही तर आरोग्य आणि सौंदर्यासाठीही केला जातो. तूप वापरून तुम्ही कायम तरुण राहू शकता. तूप तुमचे आरोग्य आणि सौंदर्य कसे वाढवू शकते ते जाणून घेऊया. चला जाणून घेऊया शुद्ध तुपाचे १० सोपे घरगुती उपाय.

***१. तूपाची क्रीम:*** तुम्ही तुमच्या चेहऱ्यावर बाजारातून आलेली मॉइश्चरायझिंग क्रीम वापरता, पण आता देशी तुपाने घरी बनवलेले मॉइश्चरायझिंग क्रीम वापरून पहा. यासाठी एका भांड्यात एक कप तूप टाका आणि त्यात ५ चमचे थंड पाणी घालून चांगले मिक्स करा. सतत ढवळत राहा आणि वितळूनघ्या. तूप चांगले वितळेपर्यंत ही प्रक्रिया करा. यानंतर ते चेहऱ्यावर लावा.

***२. चेहऱ्यावरील डाग दूर करा:*** एका मोठ्या भांड्यात १०० ग्रॅम साजूक तूप घेऊन त्यात पाणी घालून हलक्या हाताने फेणून घ्या आणि पाणी फेकून द्या. अशा रीतीने तूप अनेक वेळा धुवून वाडगा थोडावेळ वाकवून ठेवा, जेणेकरून जास्तीचे पाणीही बाहेर निघेल. आता या तुपात थोडे कापूर चांगले मिसळा आणि एका मोठ्या तोंडाच्या काचेच्या बाटलीत हे तूप भरून ठेवा, त्वचेच्या आजारांवर जसे की फोड येणे, खाज येणे या आजारावर हे एक उत्तम औषध म्हणून काम करेल. डाग, पिंपल्स आणि काळी वर्तुळे इत्यादी सर्व दूर होतात.

***३. तुपाने चेहऱ्याचा मसाज:*** त्वचेचा कोरडेपणा कमी करण्यासाठी चेहऱ्याला तुपाने मसाज केल्यास चेहऱ्याचा हरवलेला ओलावा परत मिळण्यास मदत होते. एवढेच नाही तर डोक्याला तुपाने मसाज करणे केसांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. तुपाने डोक्याला मसाज केल्याने केस दाट आणि चमकदार होण्यास मदत होते.

***४. नाभीला तूप लावा:*** नाभीवर तूप लावल्याने पोटातील आग शांत होते आणि अनेक प्रकारच्या आजारांवर फायदेशीर ठरते. यामुळे डोळ्यांना आणि केसांना फायदा होतो. शरीराची कंपन, गुडघे आणि सांधेदुखीवरही हे फायदेशीर आहे. यामुळे चेहऱ्यावरील ग्लो वाढते आणि ओठ मुलायम होतात.

***५. दृष्टी वाढवण्यासाठी उपयुक्त :*** डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार शुद्ध देशी तुपाचा एक थेंब डोळ्यांमध्ये टाकल्याने जळजळ, वेदना इत्यादी दूर होतात आणि दृष्टी वाढते.

***६. तुपाने शरीरावर मसाज करा:*** संपूर्ण शरीराला तुपाने मसाज केल्याने शरीरातील नसा मजबूत होतात आणि शरीराच्या आत आणि बाहेरील सूज मध्ये देखील आराम मिळतो. यामुळे शरीराचा थकवाही दूर होतो आणि चांगली झोप लागते. कोरड्या त्वचेला ओलावा देण्यासाठीही तुपाची मसाज प्रभावी आहे.

***७. ओठ मऊ आणि गुळगुळीत होतील:*** देसी तूप सतत ओठांवर लावल्यास तडक्यांची तसेच भेगा पडण्याची समस्या दूर होते. याने काळेपणा नाहीसा होऊन ओठ मऊ व गुलाबी होतात.

***८. डोळ्यांखालील काळी वर्तुळे:*** डोळ्यांखालील काळी वर्तुळे दूर करण्यासाठी रोज रात्री सतत साजूक तूप लावा, काही दिवसातच ती दूर होतील.

***९. सुरकुत्या आणि फ्रिकल्स:*** हे लावल्याने चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि फ्रिकल्स हलक्या होऊ लागतात आणि हळूहळू त्वचा घट्ट होते.

***१०. केस मजबूत आणि काळे होतात:*** साजूक तूप लावल्याने टाळूवरील कोरडेपणा आणि कोंडा दूर होतो आणि केस मजबूत होतात. हे अकाली केसांना पांढरे होण्यापासून प्रतिबंध करते.



# गुंतलेले आणि फ्रिजी केसांना मऊ करण्यासाठी हे ३ हेअर मास्क वापरा

*फ्रिजी केस असणे ही केसांची अशी स्थिति आहे ज्यामुळे केस कोरडे आणि निर्जीव दिसतात. केस नेहमीच कोरडे राहतात आणि केस नीटनेटके करायला कठिन जाते. या फ्रिजी केसांचे अनेक कारणे असू शकतात. जसे की प्रोटीन ची कमतरता, चुकीचे रासयनिक उत्पादक वापरणे हेअर टॉपिकलायझिंग टूल्सचा किफायतशीर वापर किंवा केसांची काळजी न घेणे. या सर्व परिस्थितीमुळे केसांचे पोषण नष्ट होऊन केस निर्जीव राहतात. आज या लेखात आम्ही तुम्हाला अशाच ३ हेअर मास्कबद्दल सांगणार आहोत, जे घरी सहज तयार करता येतात.*

### *नारळ तेल आणि कोरफड जेल हेअर मास्क -*

कुरळे केसांसाठी हेअर मास्क तयार करण्यासाठी तुम्ही हे घटक वापरू शकता-

साहित्य: नारळ तेल, आल्याचा रस, कोरफड जेल, मध, दही

कुरळे केसांसाठी हेअर मास्क बनवण्याची पद्धतः हा मुखवटा तुमचे केस फ्रीज फ्री करतो आणि त्यांना चमकदार बनवतो. एका भांड्यात २ चमचे खोबरेल तेल, १ चमचे आल्याचा रस, २ चमचे एलोवेरा जेल आणि १ चमचे मध घाला. सर्व साहित्य चांगले मिसळा. आता हे मिश्रण केसांना नीट लावा. हळूवारपणे मसाज करा आणि ३० मिनिटे सोडा. शेवटी, केस थंड पाण्याने चांगले धुवा.

### *मध आणि दही घालून तयार करा हेअर मास्क -*

साहित्य: २ चमचे नारळ तेल, १ चमचे मध, १ चमचा दही

केसांचा मास्क तयार करण्याची पद्धत: खोबरेल तेल, मध आणि दही चांगले मिसळा. त्यानंतर केस धुण्यापूर्वी हे मिश्रण केसांना लावा. आता केसांना हळू हळू मसाज करा जेणेकरून मास्क संपूर्ण केसांमध्ये चांगला पसरेल. हेअर मास्क लावल्यानंतर गरम टॉवेलने केस झाकून ठेवा. यामुळे मास्कचा प्रभाव वाढतो. सुमारे ३०-४० मिनिटांनंतर, केस थंड पाण्याने चांगले धुवा. शेवटी, तुमचे केस ब्लो ड्राय करा आणि हा मास्क आठवड्यातून दोन-तीन वेळा वापरा. हा मुखवटा तुमच्या केसांना थंडपणा आणि आर्द्रता देतो. तुमचे केस आणि त्वचा निरोगी राहण्यासाठी तुम्ही ते नियमितपणे वापरू शकता.

### *अंडी आणि ऑलिव्ह ऑइल हेअर मास्क-*

साहित्य: ऑलिव्ह तेल, अंडी आणि तेल

केसांचा मास्क तयार करण्याची पद्धत: एका भांड्यात एक चमचा ऑलिव्ह ऑईल टाका आणि एक अंडे फोडून त्यात मिसळा. हे मिश्रण केसांना लावा आणि ३० मिनिटे ठेवा. नंतर केस धुवा. या हेअर मास्कमुळे केस मऊ होतात.



# केसांना मेंदी लावण्याचे ५ सौंदर्यवर्धक फायदे

तुम्हाला हातावर मेंदी लावणे नक्कीच आवडत असेल. त्याचे सौंदर्यवर्धक फायदे जाणून घेतल्यावर ती तुम्हाला आवडणार. याचे सौंदर्यवर्धक फायदे जाणून घ्या.

जर तुम्ही केसांच्या समस्येने त्रस्त असाल तर मेंदी लावल्याने तुमच्या सर्व समस्या दूर होऊ शकतात. मेहंदी नैसर्गिक कंडिशनर म्हणून काम करते, ज्यामुळे तुमचे केस मऊ बनतातच पण केसांची वाढही होते.



चला जाणून घेऊया, केसांना मेहंदी लावल्याने कोणते सौंदर्यवर्धक फायदे होतात?

१. मेंदीमध्ये दही, आवळा पावडर, मेथी पावडर मिसळून घोळ तयार करा आणि केसांना लावा. १ ते २ तास केसांमध्ये ठेवल्यानंतर केस धुवा. असे केल्याने केस काळे, दाट आणि चमकदार होतात.

२. मेंदी वापरल्याने तुमचे केस लांब होतात. त्यात मेथीचे दाणे मिसळून ते लावल्याने त्याचे फायदे लवकर दिसतात.

३. केसांना कंडिशनिंग करण्यात मेहंदी खूप महत्त्वाची भूमिका बजावते. त्याचा सतत वापर केल्याने तुमचे केस दाट आणि मजबूत होतात. हे तुमच्या केसांच्या कोरड्या क्यूटिकलला मऊ करते आणि त्यांना चमक देखील आणते.

४. दह्यात मेंदी मिसळून त्यात लिंबाचा रस मिसळल्याने केसांमधील कोंड्याची समस्या दूर होते.


५. केस लांब आणि दाट करायचे असतील तर मेंदीमध्ये चहाच्या पानांचे पाणी मिसळा, रात्रभर भिजवा आणि सकाळी लावा. ते आठवड्यातून एकदा वापरले जाऊ शकते.असं केल्याने केस मऊ आणि दाट होतात.

## संपादकीय

# परीक्षांची पर्वा



संपादक दिपक मोरेश्वर नाईक




देशातील प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अर्थात आयआयटींमधील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची पहिली पायरी असलेल्या संयुक्त प्रवेश परीक्षा-मुख्यच्या, म्हणजे जेईई-मेनच्या अलीकडच्या प्रश्नपत्रिकेत ७५ पैकी १२ प्रश्न चुकीचे होते. जेईई-मेनमध्ये इतक्या मोठ्या संख्येने प्रश्न चुकल्याने संबंधित विद्यार्थी आणि शिक्षकवर्गात चर्चा होणे स्वाभाविकच. पण आयआयटी प्रवेशासाठीच्या परीक्षेत डझनभर प्रश्न चुकीचे म्हणून ते वगळण्याची नामुष्की परीक्षा घेणाऱ्या राष्ट्रीय यंत्रणेवर, म्हणजे नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीएवर येत असेल, तर उच्च शिक्षणाबद्दलच प्रश्न उभे राहतात. गेल्या वर्षी नीट-यूजी ही परीक्षा पेपरफुटीमुळे गाजली होती. आता जेईई-मेनच्या निमित्ताने यंदाच्या प्रवेश परीक्षा हंगामातील वादांची सुरुवात परीक्षा घेणाऱ्या यंत्रणेच्या प्रश्न विचारण्याच्या चुकांनी झाली आहे. चुका जेईई-मेन या परीक्षेत झालेल्या असल्या, तरी मुख्य प्रश्न परीक्षा घेणाऱ्या यंत्रणा सक्षम का नाहीत, हा आहे आणि त्यामुळे त्यावर भाष्य आवश्यक.

जेईई-मेन ही आयआयटीची पहिली पायरी असण्याबरोबरच यातील गुण देशातील अभियांत्रिकी महाविद्यालयांतील अखिल भारतीय स्तरावरील जागा भरण्यासाठीही ग्राह्य धरले जातात. साहजिकच देशभरातून सुमारे १५ लाख विद्यार्थी दरवर्षी या परीक्षेला बसतात. ही परीक्षा दोन सत्रांत होते. त्यापैकी एक जानेवारीत झाले, ज्याचा नुकताच निकाल लागला आणि दुसरे एप्रिलमध्ये आहे. संगणक आधारित परीक्षा असल्याने दोन वेगवेगळ्या सत्रांत आणि प्रत्येक सत्रात वेगवेगळ्या पाळ्यांमध्ये ही परीक्षा घेतली जाते. पेन-कागद पद्धतीप्रमाणे एकच प्रश्नपत्रिका छापून देशभर वितरित करावी लागत नसल्याने प्रश्नपत्रिकेला परीक्षेआधी पाय फुटण्याच्या शक्यता कमी. त्या अर्थाने ही पद्धत चांगली. मात्र, वेगवेगळ्या सत्रांसाठी वेगवेगळे, पण तेवढ्याच काठिण्यपातळीचे प्रश्न काढावे लागतात, ही यातील थोडी क्लिष्टता. अर्थात, पेपरफुटी टाळण्यासाठी तेही आवश्यक. थोडक्यात, एकाच प्रवेश परीक्षेसाठी शेकड्याने प्रश्न काढण्याची जबाबदारी. पण, म्हणून त्यातले बाराच चुकले, तर एवढे काय, असे म्हणणे हास्यास्पद ठरेल. कारण, एनटीएसारख्या स्वायत्त संस्थेने विषयानुरूप भरपूर प्रश्न काढण्याची जबाबदारी पेलणे अपेक्षितच आहे. किंबहुना, तोच संस्थेच्या स्थापनेचा एक उद्देश असून, त्यासाठी त्यांना देशभरातून विषयतज्ज्ञही उपलब्ध असतात.

यंदा झाले असे की जेईई-मेनचे पहिले सत्र झाल्यानंतर जी उत्तरसूची प्रसिद्ध झाली, त्यावर घेतल्या गेलेल्या आक्षेपांची पडताळणी झाल्यावर एनटीएने अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध करून त्यातील १२ प्रश्न वगळले. याचा अर्थ प्रश्नपत्रिकेत १२ प्रश्न चुकीचे होते! पदार्थविज्ञान, गणित, रसायनशास्त्र अशा तिन्ही विषयांसाठी काढलेल्या प्रत्येकी २५ प्रश्नांतील काही आणि एकूण १२ प्रश्न चुकले होते. नियमानुसार, परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना या १२ प्रश्नांचे पूर्ण गुण मिळणार आहेत, मग विद्यार्थ्याने तो प्रश्न सोडवलेला असो वा नसो. प्रत्येक बरोबर उत्तराला ४ गुण यानुसार ४८ गुण सर्वांना मिळतील. सत्रे वेगवेगळी असल्याने अंतिमतः पर्सेंटाइलच काढले जाणार असल्याने त्याचा एकूण निकालावर वरकरणी फारसा परिणाम होईल, असे नाही. मात्र, तरीही प्रश्नातील चुकांमुळे जे अनेक नवीन प्रश्न निर्माण होत आहेत, त्यांची तीव्रता कमी होत नाही.

ज्या साडेबारा लाख विद्यार्थ्यांनी जानेवारीत परीक्षा दिली, त्या सर्वांना ४८ गुण आयतेच मिळणार असले, तरी काही विद्यार्थ्यांनी हे १२ प्रश्न सोडविण्यासाठी बरीच डोकेफोड करण्यात वेळ घालवला आणि त्यापायी त्यांचे पुढचे काही प्रश्न सोडवायचे राहिले, वा पुढील प्रश्नांवर विचार करायलाच फारसा वेळ मिळाला नाही आणि म्हणून कदाचित त्यांची उत्तरे चुकली, असे झाले असेल, तर त्याचे काय? अशा घटनांचे मोजमाप करता येणे शक्य नाही, हे मान्य, पण हे असे घडलेले असू शकते आणि त्यासाठी एनटीएने काढलेले चुकीचे प्रश्न कारणीभूत ठरले, हे नाकारणार कसे? प्रवेश परीक्षा अधिक पारदर्शक आणि स्पर्धात्मक पद्धतीने व्हाव्यात, यासाठी एनटीए ही स्वायत्त संस्था स्थापण्यात आली. विषयतज्ज्ञ, माहिती तंत्रज्ञानातील सेवा आणि सुरक्षितता व्यावसायिक आदींची मदत घेऊन परीक्षा पद्धतीतील त्रुटी दूर करण्याचा मनोदय ह्यएनटीएह्नने आपल्या संकेतस्थळावरही जाहीर केलेला आहे.

असे असूनही अभ्यासक्रमाबाहेरचे प्रश्न, भाषांतरातील चुका, इंग्रजीतील प्रश्नपत्रिकेत ज्या प्रश्नासाठी एकाच उत्तराचा पर्याय बरोबर आहे, त्या प्रश्नासाठी भारतीय भाषांतील प्रश्नपत्रिकेत बरोबर उत्तराचे दोन पर्याय उपलब्ध असणे, अशा चुका हे हलगजीर्चे लक्षण नाही, तर काय आहे? गेल्या वर्षी याच एनटीएने घेतलेल्या नीट परीक्षेत गैरप्रकार झाले. अनेक विद्यार्थ्यांना, त्यातही काही ठरावीक केंद्रांवरील विद्यार्थ्यांना मिळालेल्या पैकीच्या पैकी गुणांवर अनेक शंका उपस्थित झाल्या. संपूर्ण परीक्षा पुन्हा झाली नसली, तरी संशय मात्र मिटला नाही. अशा वेळी ज्यांनी प्रामाणिकपणे परीक्षा दिली, त्यांचा विचार परीक्षा घेणाऱ्या यंत्रणेने केला, असे म्हणायचे का? प्रश्न फक्त जेईई-मेनमध्ये निघालेल्या १२ चुकांचा नाही, तर एनटीएच्या विश्वासार्हतेचा आणि पारदर्शकतेचा आहे. एनटीए जेईई-मेनसह नीट, यूजीसी-नेट, जेएनयूची प्रवेश परीक्षा, जीपॅट, सीमॅटसह विविध व्यवस्थापन अभ्यासक्रमांसाठीच्या संयुक्त प्रवेश परीक्षा, आयसीएआरची अखिल भारतीय प्रवेश परीक्षा, आयआयएफटीची प्रवेश परीक्षा, इग्नूची पीएचडी आणि ओपनमॅट परीक्षा, दिल्ली विद्यापीठाची प्रवेश परीक्षा आदी विविध प्रकारच्या परीक्षा घेते.

दरवर्षी होणाऱ्या गैरप्रकारांमुळे या सर्व प्रवेश परीक्षांची विश्वासार्हता पणाला लागली आहे. पदवी प्रवेशांच्या परीक्षांसाठी एनटीएसारखी स्वायत्त संस्था स्थापूनही ही अवस्था आहे, हा झाला एक भाग. दुसरा त्याहीपेक्षा नामुष्कीचा. आपल्या देशात कोणती परीक्षा यथास्थितपणे होते? बारावी, दहावीच्या परीक्षांत सामूहिक कॉपीबद्दल आजही कडक इशारे द्यावे लागतात. तरीही कॉपी होतेच. याचा ठपका परीक्षा घेणाऱ्या यंत्रणेवर ठेवता येणार नाही, हे ठीक. पण ज्यांनी प्रामाणिकपणे परीक्षा दिली, त्यांचे काय? हा प्रश्न यातूनही उरतोच.

परीक्षा देणाऱ्यांची- त्यासाठी प्रयत्नांत कसूर न करणाऱ्यांची पर्वा कुणाला, हा त्याही पुढला प्रश्न. तो तर आपल्या व्यवस्थांची लक्तरेच दाखवणारा. यूपीएससी, एमपीएससी आदी स्पर्धा परीक्षांबाबत, त्या कधी होणार इथपासून त्या सुविहित पार पडणार का, इथपर्यंतच्या प्रश्नांनी उमेदवारांची पाठ सोडणे थांबवलेले नाही. या सर्व परीक्षांना देशभरातून लाखो विद्यार्थी बसतात. या विद्यार्थ्यांना त्याची चांगली तयारी करता यावी, यासाठी या विद्यार्थ्यांचे पालक लाखो रुपये खर्च करून शिकवण्या लावतात. त्यासाठी घरे, जमिनी गहाण ठेवून पैसे उभे केले जातात. हे सगळे चांगल्या करिअरचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी असते.

पहिल्या प्रयत्नात कमी गुण मिळाले, म्हणून दुसऱ्यांदा परीक्षेला बसणारेही अनेक जण आहेत. अशा वेळी प्रश्नपत्रिकेत इतक्या चुका करून किंवा गैरप्रकारांना आळा घालण्यात कमी पडून आपण किती जणांच्या आशा-आकांक्षांशी खेळतो आहोत, याचे भान परीक्षा घेणाऱ्या यंत्रणांना खरेच आहे का? यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात एकूणच परीक्षा व्यवस्थेविषयी अविश्वासाचे तण माजू लागले आहे. परीक्षांची पर्वा ज्या देशात- बरेच अप्रामाणिक परीक्षार्थी असूनसुद्धा- अनेक प्रामाणिक विद्यार्थ्यांना असते, त्या देशातल्या व्यवस्थेनेही परीक्षेचे गांभीर्य ओळखून कारभार सुधारायला हवा.

## धनंजय मुंडे-सुरेश धस यांच्या भेटीचा अन्वयार्थ!



मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर एकापेक्षा एक घणाघाती आणि गंभीर आरोप करणारे भाजपचे आमदार सुरेश धस यांनी थेट धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यामुळे अनेकांना प्रचंड धक्का बसला. तेही भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे या भेटीला फारसे महत्त्व देत नसल्याचे दाखवत असले तरी धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्या भेटीमध्ये बराच अन्वयार्थ दडलेला आहे, हे न समजण्याइतकी जनता काही अजाण नाही.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची झालेली अमानुष हत्या हे हिमनगाचे एक टोक असून एकूणच बीड जिल्ह्यामध्ये काय भयानक स्थिती झालेली आहे, याची जाहीरपणे बिनधास्त पोलखोल करर्णायाचा धडाका भाजपचे आमदार सुरेश धड यांनी लावला होता. त्यामुळे त्यांनी ज्यांना लक्ष्य केले होते, ते राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्याविषयी महायुती सरकारकडून काही तरी ठोस निर्णय घेतला जाईल, असे वाटत होते. पण चक्क सुरेश धस हेच धनंजय मुंडे यांच्या भेटीला गेले. त्यामुळे लोकांचा मोठा अपेक्षाभंग झाला. त्यात पुन्हा धस यांना प्रसारमाध्यमांनी या विषयी विचारले तेव्हा त्यांनी जे उत्तर दिले ते काही पटण्यासारखेही नव्हते. धस म्हणाले की, धनंजय मुंडे यांच्या डोळ्याचे ऑपरेशन झाले होते, त्यामुळे त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी मी गेलो होतो. एखाद्या व्यक्तीचा फार मोठा अपघात झाला असेल किंवा आजार झाला असेल आणि त्याच्या जीवाला प्रचंड मोठा धोका निर्माण झाला असेल तेव्हा माणुसकीच्या दृष्टिकोनात त्या स्थितीत एखाद्याची विचारपूस करणे समर्थनीय ठरू शकते, पण इथे धनंजय मुंडे यांच्या डोळ्याचे सर्वसाधारण ऑपरेशन झालेले आहे, ते चांगले हिंडत फिरत आहेत. शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आहेत. अशा स्थितीत सुरेश धस हे मुंडे यांना जाऊन भेटले. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी याविषयी प्रसारमाध्यमांना माहिती दिली. त्यावेळी ही भेट जगजाहीर झाली आणि अनेकांना धक्का बसला. त्यात पुन्हा ही भेट साडेचार तास झाली असे बावनकुळे म्हणाले, आता डोळ्याचे ऑपरेशन झालेल्या धनंजय मुंडे यांची धस साडेचार तास अशी काय विचारपूस करत होते, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. बावनकुळे हे भाजपचे प्रदेशाध्यक्ष आहेत, त्यामुळे ते आपल्याच पक्षांच्या झुंजार आमदाराची कशासाठी बदनामी करतील, असाही प्रश्न पडतो. धनंजय मुंडे यांच्या पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, जोपर्यंत धनंजय मुंडे यांच्यावर आरोप सिद्ध होत नाही, तोपर्यंत त्यांचा राजीनामा घेतला जाणार नाही.

दुसऱ्या बाजूला धनंजय मुंडे आणि सध्या तुरुंगात असलेले वाल्मिक कराड यांच्याविषयी एकाहून एक प्रकरणे बाहेर येत आहेत. त्यात सुरेश धस हे घोटाळे समोर आणण्यामध्ये आघाडीवर आहेत. अशा स्थितीत अजित पवार हे जरी राजकीय कारणामुळे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेत नसले तरी आता मुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमेला धक्का बसू लागला आहे. तुमच्याच पक्षाचे आमदार तुमच्याच सरकारमधील मंत्र्यांवर एकापाठोपाठ गंभीर आरोप करत आहेत आणि तुम्ही काहीच कारवाई करत नाही, असा प्रश्न फडणवीस यांच्याविषयी उपस्थित होत आहे. त्यामुळे या कोंडीतून भाजपला मार्ग काढणे गरजेचे बनले आहे. सध्या तुरुंगात असलेले वाल्मिक कराड आणि त्याच्या हस्तकांवर विविध प्रकारचे आरोप होत आहेत. त्यांची चौकशी सुरू आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा विषय लावून धरलेला आहे. अजित पवार यांना भेटून त्यांना घोटाळ्यांची कागदपत्रे दिली आहेत. भाजपसाठी खरे तर धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे हे दोघेही अवघड जागेचे दुखणे आहे. कारण गोपीनाथ मुंडे हे महाराष्ट्रातील भाजपचे एक प्रमुख नेते होते. त्यांची पुढची पिढी म्हणजे धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे हे आहेत. गोपीनाथ मुंडे हयात असतानाच धनंजय मुंडे हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील झाले. गोपीनाथ मुंडे यांचे निधन झाल्यानंतर पंकजा मुंडे या त्यांच्या उत्तराधिकारी म्हणून पुढे आल्या, पण आपणच जनतेच्या मनातील मुख्यमंत्री आहोत, असे जाहीरपणे सांगून २०१४ नंतर मुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना आव्हान देऊ लागल्या.

पंकजा मुंडे यांची एकूणच भूमिका ही फडणवीस यांना आव्हान देणारी राहिलेली आहे. त्यात पुन्हा धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादीमध्ये गेल्यावर बीडमध्ये आपली बाजू मजबूत करण्यासाठी भाजपसाठी आव्हान उभे केले. त्यामुळे धनंजय मुंडे यांना आवर घालण्यासाठी भाजपला काही तरी उपाययोजना करणे आवश्यक होते. कारण बीडमध्ये राखेतून जे माफिया निर्माण झालेले आहेत, ते काही एका दिवसात निर्माण झालेले नाही. वाल्मिक कराडच्या इशाऱ्यानुसार त्याच्या हस्तकांनी संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या केली असे आरोप होत आहेत. त्याची चौकशी सुरू आहे. सुरेश धस यांनी जेव्हा आकाचा आका असे म्हणत धनंजय मुंडे यांना टार्गेट करायला सुरुवात केली, तेव्हा भाजपने त्यांना मोकळीक दिल्याचे दिसत होते. पण अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे भाजपचे काही चालेनासे झाले.

सुरेश धस एका बाजूला राज्यात धनंजय मुंडे यांच्या विरोधातील विविध आंदोलनांना उपस्थिती लावून मुंडे यांच्यावर गंभीर आरोप करत आहेत. त्यामुळे भाजपसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. कारण राज्यभर धनंजय मुंडे यांच्या विरोधात इतका गदारोळ सुरूअसताना राज्य सरकार काहीच हालचाल करत नाही, असे चित्र उभे राहिले आहे. दुसऱ्या बाजूला उपमुख्यमंत्रीपद असलेले एकनाथ शिंदे हे फारसे फडणवीस यांच्यासोबत दिसत नाहीत. ते एकाच सरकारमध्ये असले तरी मागच्या कार्यकाळात जशी त्यांची सलगी होती, तशी आता दिसेनाशी झालेली आहे. एकनाथ शिंदे आपली नाराजी वेगवेगळ्या निमित्ताने व्यक्त करताना दिसत आहेत.

आता तर शिवसेनेच्या मंत्र्यांकडे जी खाती आहेत, त्यांच्या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन केल्याचे ऐकिवात आहे. त्यामुळे सरकारमध्ये राहून एकनाथ शिंदे हे सवतासुभा निर्माण करत आहेत, असे दिसत आहेत. त्यामुळे पूर्वी फडणवीस त्यांना प्रत्येक वेळी एकनाथराव शिंदे असे संबोधताना दिसत, तसे आता दिसत नाहीत. शिंदेंची सरकारमध्ये राहूनही स्वतंत्रवृत्ती पाहिल्यावर भाजपला अजित पवार यांना नाराज करून जमणार नाही. त्यामुळे धनंजय मुंडे यांच्यावर इतके गंभीर आरोप होत असतानाही देवेंद्र फडणवीस त्यांच्यावर काही कारवाई करताना दिसत नाहीत. इतकेच नव्हे तर एक आमदार एका मंत्र्याला जाऊन भेटला तर त्यात काही गैर नाही, अशी प्रतिक्रिया धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्या भेटीवर फडणवीस यांनी दिली. खरे तर ही प्रतिक्रिया फडणवीस यांच्यासारख्या कर्तव्यनिष्ठ व्यक्तीला शोभणारी नाही, पण त्यांचाही नाईलाज असावा. एका बाजूला एकनाथ शिंदे यांची वाढती नाराजी आणि दुसऱ्या बाजूला धनंजय मुंडे यांच्यावरील धस यांच्या आरोपांमुळे सरकारची प्रतिमा मलीन होत आहे. अशा वेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंदशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत मुंडे-धस यांची साडेचार तास चर्चा होते, ती बातमी स्वतः बावनकुळे प्रसारमाध्यमांना देतात, त्यात बरेच काही दडलेले आहे असे दिसते. कारण धस यांची जर धनंजय मुंडे यांच्याशी भेट घडवून आणली तर धस यांची जनमनातील प्रतिमा आपोआप मलीन होणार आहे. त्यांना मिळत असलेला पाठिंबा कमी होणार आहे, त्यांच्या हेतूवर शंका घेतली जाणार आहे, यांची कल्पना बावनकुळेंना असावी. धस यांची हवा काढली तर धनंजय मुंडे यांच्यावरील आरोपांचा जो गदारोळ सुरू आहे, तो बराच कमी होईल, याचीही भाजपच्या नेत्यांना कल्पना असावी. आपण धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यावर आपली प्रतिमा मलिन होणार, इतके न कळण्याइतके धस काही दूधखुळे नाहीत, पण पक्षाच्या आदेशापुढे त्यांनाही काही करता येऊ शकत नसावे. धनंजय मुंडे प्रकरण फार तापवणे भाजपच्यादेखील हिताचे नाही, हाच बावनकुळेंच्या उपस्थितीत धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यात झालेल्या भेटीचा अन्वयार्थ असावा.

## ‘न्यू इंडिया’ही बुडाली...

कामगार नेते जार्ज फर्नांडिस यांच्या पुढाकाराने ५७ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या मुंबईस्थित न्यू इंडिया सहकारी बँकेवर रिझर्व्ह बँकेने लादलेले निर्बंध हजारो गुंतवणूकदार व ग्राहकांच्या काळजाचा ठोका चुकवणारे आहेत. तब्बल ३५ वर्षांपूर्वी शेड्यूल्ड बँकेचा दर्जा मिळालेल्या या बँकेची आर्थिक स्थिती गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने ढासळत होती. त्यातून मार्ग निघत नसल्याचे लक्षात आल्यावर ही कठोर कारवाई करण्यात आली. मात्र प्रामुख्याने सहकारी बँकांची अशी अवस्था का होते? त्याला जबाबदार कोण? व्यवस्थापन मंडळ की यावर देखरेख ठेवणाऱ्या सरकारी यंत्रणा? यासारखे अनेक प्रश्न पुन्हा एकदा उभे ठाकले आहेत. सहकार कायद्यांन्वये स्थापन झालेल्या बँका रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार कार्यरत असतात. त्यांच्या वित्तीय व्यवहाराचे वेळोवेळी परीक्षण व अंकेक्षण होत असते. तरीही त्या डबघाईला येत असतील तर यंत्रणेतला भुसभुशीतपणा समोर येतो. अलीकडे ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी बँकांमधील स्पर्धा कमालीची वाढली आहे. ठेवीवर अधिक व्याजदर व कर्जावर कमी अशा योजना बँकांकडून सर्रास राबवल्या जातात. अनेकदा त्या रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या मर्यादांचे उल्लंघन करणाऱ्या असतात. अशा योजनांना वेळीच चाप लावण्याचे काम ही मध्यवर्ती बँक खरोखर करते का? करत असेल तर मग परिस्थिती आटोक्याबाहेर जाण्याची वेळ येतेच कशी? प्रत्येक बँकेची वित्तीय स्थिती बघण्यासाठी दर सहा महिन्यांनी होणाऱ्या बैठकांमध्ये नेमके काय घडते? यात रिझर्व्ह बँकेकडून दिल्या जाणाऱ्या निर्देशांचे पालन या बँका करत नसतील तर वेळीच कारवाई का केली जात नाही असे अनेक प्रश्न यातून उभे ठाकले आहेत. प्रकरण अगदी गळ्याशी आले की अशी धडक कारवाई करून मोकळे व्हायचे असेच धोरण जर नियामक संस्थांकडून राबवले जात असेल तर गुंतवणूकदारांच्या विश्वासाला जो तडा जातो व नंतर दीर्घकाळ त्यांना हेलपाटे घालावे लागतात त्याचे काय? ‘न्यू इंडिया’त अडीच हजार कोटींच्या ठेवी होत्या त्या परत मिळण्याचा मार्ग पुढचे किमान सहा महिने तरी बंद झाला आहे. मध्यंतरी केंद्र सरकारने अशा प्रकरणात ठेवीदारांचे नुकसान होऊ नये म्हणून पाच लाखापर्यंतची रक्कम परत मिळेल असा कायदा केला. त्यानुसार प्रत्येक बँकेला ठेवींवर विमा काढणे बंधनकारक करण्यात आले. जाणकारांच्या म्हणण्यानुसार सहकार क्षेत्रातील अनेक बँका पैसे वाचवण्यासाठी पूर्ण ठेवींचा विमा काढत नाहीत. ही चलाखी रिझर्व्ह बँकेच्या लक्षात कशी येत नाही? यामुळे अलीकडच्या काळात ज्या बँकांवर निर्बंध आणले गेले त्याचे ठेवीदार निदान पाच लाख तरी परत मिळावे म्हणून अजूनही वणवण भटकत आहेत. मुंबईच्याच ‘पंजाब ॲण्ड सिंध’चे उदाहरण अगदी ताजे. याचाच अर्थ सर्व कायदे व नियम असूनसुद्धा त्यातून पळवाटा काढण्याचे काम बँक व नियामक संस्थांच्या पातळीवर राजरोसपणे सुरू आहे. त्याचा फटका मात्र सामान्यांना बसतो. सहकारात होणारी फसवणूक टळावी, हेच क्षेत्र अधिक सशक्त व्हावे यासाठी केंद्र सरकारने त्यांच्या पातळीवर हे खाते सुरू केले. त्याचा जोरदार प्रचार व प्रसार सध्या सुरू आहे.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई.**
**निविदा सुचना क्र. १७ सन २०२४-२५**

**दुरध्वनी क्र. -०२२-२७५७१५३४** **e-mail : harbournkb.ee@mahapwd.gov.in**

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४, सा.बां. विभागातील योग्य नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोकण भवन, नवी मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. परिशिष्ट

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत | कंत्राटदारांचा वर्ग |
|---|---|---|---|
| १ | शिरगांव येथे मासळी सुकविण्याचा ओटा बांधणे, ता. जि. पालघर | रु. २०,४१,१३७/- | मजूर सहकारी संस्था मर्यादित (फक्त पालघर जिल्हामधील) |
| २ | वडराई येथे रस्ता बांधणे , ता. जि. पालघर | रु. ४४,९६,४७३/- | खुला वर्ग - ४ आणि वरील |

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- दि. २५/०२/२०२५ स. ११.३० ते ०५/०३/२०२५ दु. १४.०० पर्यंत

निविदा उघडण्याचा कालावधी :- दि. ०६/०३/२०२५ दु. १५.०५ वा.

**टिप - ई- निविदेची संपुर्ण माहिती खाली नमुद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.**

१. http://mahapwd.gov.in
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर व सुचना फलकावर कळविण्यात येईल.)
३. कार्यालयातील सूचना फलक.

जा. क्र. पअउ/का-२/निविदा /३५७/२०२५
पत्तन अभियंता यांचे कार्यालय,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबई -४०० ६१४.
दिनांक -२१/०२/२०२५

(एस.एस. पवार)
पत्तन अभियंता
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबई

विमाका/कोवि/२०२४-२०२५/३५३

# कपाळ फोडताच जागेवर कोसळले... रिक्षावाल्याने भरदिवसा माजी आमदाराला संपवलं; शहर हादरलं

**बेळगाव:** बेळगावमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे, रिक्षा चालकानं केलेल्या हल्ल्यामध्ये माजी आमदाराचा मृत्यू झाला आहे. या घटनेनं एकच खळबळ उडाली आहे. शहरातील खडे बाजार परिसरात ही घटना घडली आहे. आरोपी रिक्षाचालकाला पोलिसांनी अटक केलं आहे. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. समोर आलेल्या माहितीनुसार गोव्याचे माजी आमदार लहू मामलेदार यांचा आज शनिवारी दुपारी बेळगाव शहरातील खडे बाजार परिसरात खून झाला आहे. एका रिक्षा चालकाने केलेल्या जोरदार हल्ल्यात मामलेदार यांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी



आरोपी रिक्षाचालकाला मार्केट पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार गोव्याचे माजी आमदार लहू मामलेदार हे बेळगाव येथील खाडेबाजार परिसरात असलेल्या श्रीनिवास लॉजमध्ये उतरले होते. आज दुपारी ते आपली कार घेऊन येत असताना एका रिक्षाला कारची धडक बसली. यावरून मामलेदार आणि रिक्षाचालकात वादावादी झाली. यावेळी रिक्षा चालकाने मामलेदार यांच्या कपाळावर जोरदार प्रहार केला. मामलेदार त्या हल्ल्यातून सावरत लॉजकडे निघाले असतानाच रिसेप्शन काउंटर जवळ कोसळले. लॉजच्या मॅनेजरने या घटनेची माहिती मार्केट पोलिसांना दिली. मार्केट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. लहू मामलेदार यांना बेळगावच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी त्यांची वैद्यकीय तपासणी केली असता ते मृत असल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. याप्रकरणी पोलिसांनी रिक्षा चालकाला अटक केली आहे. या प्रकरणात पुढील चौकशी सुरू आहे. रिक्षाला कारचा धक्का लागल्याच्या शुल्लक कराणातून ही घटना समोर आली आहे. कारचा धक्का लागल्यानंतर आरोपी रिक्षा चालक आणि माजी आमदारांमध्ये वाद झाला. त्यानंतर रिक्षाचालकाने माजी आमदार मामलेदार यांच्या कपाळावर जोरदार प्रहार केला. हा प्रहार वर्मी लागल्यानं लॉजमध्ये येताच ते कोसळले, त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केलं. या प्रकरणात पोलिसांनी रिक्षाचालकाला अटक केली असून, तपास सुरू असल्याचं सांगितलं.

# 'मॅडम, आज मेकअप केला नाही?' IAS अधिकाऱ्याच्या पोस्टवरील कमेंटला 'हाहा' इमोजीने दिला रिप्लाय, गुन्हा दाखल

**आसाम :** आसाम येथील धेकिअजुली येथील व्यक्तीवर हसण्याची इमोजी वापरत प्रतिक्रिया दिल्यावरूम गुन्हा दाखल झाल्याचा प्रकार समोर आला आहे. दुर्सया एका व्यक्तीने कोकराझारच्या जिल्हा उपायुक्त वरनाली देका यांनी मेकअप केला नसल्याबद्दल फेसबुकवर केलेल्या कमेंटला रिप्लाय देताना ही हाहा इमोजी वापरली होती. गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव अमित चक्रवर्ती असे आहे. दरम्यान आयएएस अधिकारी डेका यांनी गुन्हा दाखल केल्यानंतर या व्यक्तीला त्याच्या शहरापासून २७३ किमी अंतरावरील कोकराझार येथील कोर्टात हजर राहण्यासाठी समन्स पाठवण्यात आले आहे.




या महिला अधिकाऱ्याने इमोजी वापरणारा अमित चक्रवर्ती आणि फेसबुकवर कमेंट करणांया व्यक्तीसह इतर दोघांवर सायबर स्टॉकिंग आणि अपमानास्पद लैंगिक टिप्पणी केल्याचा आरोप केला आहे.

**नेमकं काय झालं?**

चक्रवर्ती यांनी नरेश बारुआ याने डेका यांच्या फोटोवर केलेल्या कमेंटला ह्यहाहाह्ल म्हणजेच हसतानाची इमोजी वापरून प्रतिक्रिया दिली होती. बारुआ यांनी डेका यांच्या पोस्टवर कमेंट करताना मॅडम, आज मेकअप केला नाही? (नो मेकअप टुडे, मॅम?) अशी कमेंट केली होती. डेका यांनी नरेश बारुआचा कमेंटवर, तुम्हाला काय अडचण आहे? असं उत्तर देखील दिलं होतं. मात्र या कमेंटचा मुद्दा पुढे चांगलाच पेटला आणि डेका यांनी कोकराझार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांनी आपल्या तक्रारीत चक्रवर्ती, बारूआ आणि तिसरा व्यक्ती अब्दुल सुदूर चौधरी यांच्यावर आरोप केले आहेत. डेका यांनी दिला होता इशारा न्यायालयात सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये डेका आणि तिन्ही आरोपींबरोबर झालेल्या संवादाचे स्क्रीनशॉट जोडण्यात आले आहेत. ज्यानुसार एका पोस्टमध्ये डेका यांनी कृपया भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ ड अंतर्गत येणारे सायबर स्टॉकिंगचे कलम एकदा तपासून घ्या, असा इशारा देखील चौधरी याला दिला होता. तुम्ही त्या अंतर्गत दोषी आहात आणि मी सायबर सेलकडे तक्रार दाखल करत आहे. तुम्ही मला स्टॉक करण्यापेक्षा तुमच्या कामावर लक्ष द्यायला हवे होते, असेही डेका म्हणाल्या.

चक्रवर्ती यांना टॅग करत केलेल्या दुर्सया एका पोस्टमध्ये डेका म्हणाल्या होत्या की, ह्हे अपमानास्पद आणि लैंगिकदृष्ट्या रंगभेद करणारी टिप्पणी आहे. कलम ३५४ अ तपासा. मी तुमच्या विरोधात तक्रार दाखल करत आहे.

# न्यू इंडिया बँक घोटाळा प्रकरणात बडा मासा गळाला, पोलिसांची मोठी कारवाई



**मुंबई :** न्यू इंडिया बँक घोटाळा प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. पोलिसांनी बँक घोटाळा प्रकरणात बँकेचे माजी महाव्यवस्थापक हितेश मेहता याला ताब्यात घेतलं आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडून ही कारवाई करण्यात आली आहे. हितेश मेहताची रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात आली आहे. या चौकशीमध्ये त्याने आरबीआयच्या अधिकाऱ्यांसमोर खळबळजनक कबुली दिली आहे. बँकेमधील 122 कोटी रुपये टप्प्याटप्प्यानं काढून ओळखीतल्या लोकांना दिल्याची कबुली मेहताकडून देण्यात आली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार हितेश मेहताने प्रभादेवीच्या कार्यालयातून 112 कोटी तर गोरेगावच्या कार्यालयातून 10 कोटी गायब केले आहेत. सध्या हितेश मेहता आर्थिक गुन्हे शाखेच्या ताब्यात असून त्याची चौकशी सुरू आहे. हितेश मेहताला आजच अटक देखील होऊ शकते. दरम्यान सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार या बँकेत तब्बल 122 कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे.

सबंधित प्रकरणात जबाबदार असणाऱ्या हितेश मेहताला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून, त्याने आरबीआय अधिकाऱ्यांच्या चौकशीमध्ये आपला गुन्हा कबुल केल्याची माहिती समोर येत आहे. १९९० पासून हितेश मेहता या बँकेत कार्यरत आहे. हितेश मेहताची चौकशी सध्या सुरू आहे. या सर्व रकमेची त्याने रोख स्वरुपात अफरातफर केल्याची माहिती समोर आली आहे.


**6 महिन्यांसाठी बंदी**

घोटाळा उघड झाल्यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेकडून या बँकेवर सहा महिन्यांची बंदी घालण्यात आली आहे. सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत. बँकेवर बंदीचं वृत्त समोर येताच पैसे काढण्यासाठी ठेवीदारांनी एकच गर्दी केली. अनेकांचे पैसे बँकेत अडकले आहेत. या बँकेच्या देशभरात एकूण 26 शाखा आहेत. यामध्ये लाखो ठेविदारांनी आपला पैसा गुंतवला आहे. बँकेवर बंदी आल्यामुळे ठेवीदारांची धाकधूक वाढली आहे. आता या प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई केली असून, बँकेचा माजी महाव्यवस्थापक हितेश मेहता याला ताब्यात घेतलं आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडून ही कारवाई करण्यात आली आहे. त्याने घोटाळ्याची कबुली देखील दिल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरानं चांगलीच खळबळ उडाली आहे.

# रणवीर अलाहबादीयाची केस लढवणारे अभिनव चंद्रचूड कोण आहेत?

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून देशभरात इंडियाज गॉट लेटेंट मधील आक्षेपार्ह विधानांमुळे रणवीर अलाहबादीया हे नाव देशभरात चर्चेर्चा विषय ठरत आहे. याच रणवीर अलाहबादीयामुळे आता आणखी एक नाव चर्चेत आले आहे. हे नाव आहे अभिनव चंद्रचूड. अभिनय चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयात रणवीर अलाहबादीयाच्या बाजूने लढत आहेत. ते माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांचे पुत्र आहेत. भारताच्या न्यायिक वतुर्ळात अभिनव चंद्रचूड यांच्या





कुटुंबाचे नाव खूप मोठे आहे. त्यांच्या वडिलांना मे २०१६ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यानंतर ते भारताचे सरन्यायाधीश झाले. न्यायव्यवस्थेत त्यांच्या वडिलांचे मोठे पद असूनही, अभिनव यांनी त्यांच्या वडिलांच्या कार्यकाळात कधीही सर्वोच्च न्यायालयात खटला लढवला नव्हता. गेल्या वर्षी त्यांच्या निरोप समारंभाच्या भाषणात, माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी त्यांच्या दोन्ही मुलांबद्दल, अभिनव आणि चिंतन यांच्याबद्दल एक किस्सा सांगितला होता. ते म्हणाले होते की, मी एकदा दोघांनाही सर्वोच्च न्यायालयातही खटला चालवत जा असे सांगितले होते. कारण मला त्यांना जास्तीत जास्त भेटण्याची संधी मिळाली असती. पण, व्यावसायिक कारणांमुळे दोघांनीही ही ऑफर नाकारली होती. १९८२ ते १९८५ दरम्यान, हार्वर्डमध्ये शिक्षण घेत असताना माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी कोणत्याही भारतीय न्यायालयात हजर राहण्याचे टाळले होते. कारण त्यावेळी त्यांचे वडील, वायव्ही चंद्रचूड हे भारताचे सरन्यायाधीश होते. अशी आठवण चंद्रचूड यांनी मागे एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत सांगितली होती. अभिनव चंद्रचूड हे एक कुशल वकील आणि लेखक देखील आहेत. त्यांनी स्टॅनफोर्ड लॉ स्कूलमधून डॉक्टर ऑफ द सायन्स ऑफ लॉ आणि मास्टर ऑफ द सायन्स ऑफ लॉ पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या लिंक्डइन प्रोफाइलनुसार, त्यांनी २००८ मध्ये मुंबईतील गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. नंतर त्यांनी हार्वर्ड लॉ स्कूलमधून कायद्यात पदव्युत्तर पदवी मिळवली. त्यांनी गिब्सन, डन अँड क्रचर या आंतरराष्ट्रीय लॉ फर्ममध्ये सहाय्यक वकील म्हणूनही काम केले आहे. याचबरोबर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत, ज्यात रिपब्लिक ऑफ रेटोरिकः फ्री स्पीच अँड द कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया (२०१७) आणि सुप्रीम व्हिस्पर्सः कॉन्व्हर्सेशन्स विथ जजेस ऑफ द सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया १९८०-१९८९ (२०१८) यांचा समावेश आहे.


# आता या ब्रँडची दारू मिळणार तब्बल 50 टक्क्यांनी स्वस्थ

**दिल्ली :** भारत सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. बॉर्बन व्हिस्कीवरील आयात शुल्कामध्ये मोठी कपात करण्यात आली आहे. बॉर्बन व्हिस्कीवरील आयात शुल्क तब्बल 50 टक्के कमी केलं आहे.अमेरिकेसोबत व्यापक व्यापार करारावर वाटाघाटी सुरू करण्याच्या योजनेच्या घोषणेदरम्यान, सरकारने हे पाऊल उचललं आहे. 13 फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यामध्ये चर्चा झाली. त्यापूर्वीच बॉबर्न व्हिस्कीवरील आयात शुल्कामध्ये कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

केवळ बॉर्बन व्हिस्कीवरील आयात शुल्कामध्येच कपात करण्यात आली आहे, इतर कोणत्याही दारूच्या ब्रँडवरील आयात शुल्कात कपात करण्यात आली नसून, त्यांचे दर जौसे थे राहणार आहेत. त्यांच्यावर शंभर टक्के शुल्क आकारण्यात येणार आहे. अमेरिका हा भारताचा बॉर्बन व्हिस्कीचा प्रमुख निर्यातदार देश आहे, भारतात जेवढी दारू आयात केली जाते, त्यातील तब्बल 25 टक्के दारू ही एकट्या अमेरिकेमधून आयात होते. बॉर्बन व्हिस्की हा अमेरिकेतली सर्वात प्रसिद्ध आणि जुना दारूचा ब्रँड आहे. ही व्हिस्की प्रामुख्यानं मक्यापासून बनवली जाते. बॉर्बन व्हिस्कीची टेस्ट ही थोडीसी गोडसर लागते. त्यामुळे अनेकांची ही फेव्हरेट दारू असून, जगभरात तिचा प्रचंड खप आहे. तुम्ही या व्हिस्कीला थेट प्या किंवा कॉकटेल करा मात्र तुम्हाला पुन्हा तोच तो अनुभव मिळतो. बॉर्बन हा अमेरिकेतील एक प्रसिद्ध आणि जुना व्हिस्कीचा ब्रँड आहे. ही व्हिस्की बनवताना 51 टक्के मक्का वापरली जाते. या दारूची निर्मिती ही जळालेल्या लाकडी पिपामध्ये केली जाते.त्यामुळे या दारूला एक विशिष्ट प्रकारचा स्वाद आणि रंग येतो.

# १७ वर्षांपूर्वी बेपत्ता झालेल्याचा शोध

**मुंबई :** काळाचौकी पोलिसांच्या हद्दीतून १७ वर्षांपूर्वी बेपत्ता झालेल्या व्यक्तीला शोधण्यात अखेर पोलिसांना यश आले. कोणतीही ठोस माहिती नसताना तंत्रज्ञानाच्या मदतीने पोलिसांनी या व्यक्तीला शोध घेतला आणि मुरबाड येथून बेपत्ता व्यक्तीचा शोधून काढले. त्यानंतर त्यांची कुटुंबियांसोबत भेट घडवून आणली. १७ वर्षांपूर्वी पती बेपत्ता झाल्याची तक्रार महिलेने केली. राज्य महिला आयोगामार्फत तक्रारदार महिलेचे एप्रिल २००७ मध्ये पती घरातून निघून गेल्याची तक्रार पोलिसांना प्राप्त झाली होती. त्याबाबत महिलेने तक्रार अर्ज केला होता. महिला आयोगाकडून आलेल्या तक्रारीची पोलिसांनी १२ मार्च २०२४ रोजी नोंद केली. संबंधित व्यक्ती एप्रिल २००७ मध्ये बेपत्ता झाल्यानंतर एवढ्या वर्षांनी ही तक्रार पोलिसांना प्राप्त झाली. त्यामुळे बेपत्ता असलेल्या व्यक्ती चंद्रकांत कानू जोशी यांच्याबाबत कोणतीही ठोस माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे पोलिसांनी जोशीच्या परिचित



व्यक्तींकडून माहिती घेण्यास सुरूवात केली त्यावेळी चंद्रकांत जोशी यांचे मित्र, त्याचा चुलत भाऊ, सख्खी बहीण यांच्याशी संपर्क साधून माहिती मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला.त्यांनाही चंद्रकांतबाबत काहीच माहिती नव्हती. पण पोलिसांनी त्यानंतरही तपास सुरूच ठेवला. बेपत्ता व्यक्तीचा शोध घेत असताना वेगवेगळ्या तांत्रिक पध्दतीचा उपयोग करून जोशी यांच्याबद्दल विविध व्यक्तींना विचापूस करण्यात आली. त्यावेळी त्यांच्या एका मित्राने त्यांना फार वर्षांपूर्वी पाहिल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ मित्राकडून माहिती घेतली असता २०१५ झ १६ मध्ये मुरबाड येथे एका फॉर्म हाऊसमध्ये त्यांना पाहिल्याचे सांगितले. पण खूप वर्ष झाल्यामुळे त्याला फार्महाऊसचे नाव आठवत नव्हते.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

**उद्यान विभाग**

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे - ४०१ १०७, दुरध्वनी - २८१०३४०९.

**जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/११०८/२०२४-२५** **दिनांक : १८/०२/२०२५**

**// जाहिर नोटीस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | ठिकाण | वृक्षांची नावे | वृक्षांची संख्या | मुळासहित काढणे / पुन:रोपण करणे | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सृष्टी कॉम्प्लेक्स से-०३ ऑ.हौ,सो.लि. मिरारोड (पू) या सोसायटीच्या जागेत असुन छोट्या मुलांना खेळण्याकरीता जागा अपुरी पडत असल्याने, सदर १६ नग झाडे बाधित होत आहेत. त्यामुळे सदरची झाडे मुळासहित काढुण पुन:रोपण करणे आवश्यक आहे. **सृष्टी कॉम्प्लेक्स से-०३. ऑ.हौ,सो.लि. यांचे दि. १८/०२/२०२५ रोजीचे पत्र** | चाफा | १३ | मुळासहित काढणे पुन:रोपण करणे | विकास कामात बाधित |
| | | बॉटलपाम | ०३ | | |

यासदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची / स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती / सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**जा.क्र. मनपा/मावज/ई- ४२७७१७०/२०२४-२५**
**दि. २०/०२/२०२५**

**(कांचन गायकवाड)**
**सहाय्यक आयुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com